## प्रकरण – 4 थे

# ' वाड्देववासांच्या वाड्.मयाचे स्वरुप व माहात्म्य'

पृष्ठ क्र. 25 ते 45

## * प्र क र ण – 4 थे *

### बाइदेवबासांच्या वाड्.मयाचे स्वरूप व माहात्म्य

बाइदेवबासांची सर्व ग्रंथसंपदा अभ्यासिली असता तिचे स्वरूप गद्य आहे. त्यांच्या वाड्.मयाचे विशेष पाहताना त्यांच्या गंथरचनेचा स्वतंत्रपणे विचार करणे क्रमप्राप्त ठरते. त्यांचे ग्रंथ पुढीलप्रमाणे –

1.) प्रसादसेवा

2.) पूजावसर

3.) मूर्तिज्ञान

4.)नामाचे दहा ठाय.

बाइदेवबासांची रचना :

प्रसादसेवा

साधारणतः प्रसाद म्हणजे पूजा आरतीनंतर खाण्यासाठी हातावर ठेवली जाणारी एखादी वस्तू.' परंतु महानुभाव पंथात मात्र 'प्रसाद 'स वेगळा सांप्रदायिक अर्थ आहे. त्यांच्या मते, अनन्यभक्तीचे प्रतिक या नात्याने परमेश्वरसंबंधी वस्तूचे दर्शन – पूजन– वंदन– स्मरण इ. म्हणजे 'प्रसाद होय. प्रसादाची नाविन्यपूर्ण गोडी असणारी ही बाइदेवांची अत्यंत छोटेखानी रचना आहे. भाषेला प्रसादगुणाची देणगी आहे. पांडित्याचा लवलेश कुठेही नाही. छोटी, सुलभ वाक्ये व शैली ओघवती आहे.

परमेश्वर ब्रह्म, आनंद, चिद्घन व ज्ञानस्वरूपात असतो. तो अव्यक्त असतो. निराकार असतो. पण जीवोध्दारासाठी मात्र तो अवतार घेतो. त्याची चार प्रकाराने साधना तपश्चर्या करता येते. स्थान प्रसाद, वासनिक म्हणजे दीक्षा घेऊ इच्छिणारा व भिक्षू ( पंप्रिय संन्यस्त ) यांची सेवा करून परमेश्वराची सेवा करता येते. या चतुर्विध साधनापैकी असणारे महत्वाचे साधन प्रसादसेवा होय.

परमेश्वर मार्गाच्या बोधानंतर जीव अज्ञान योनीतून निघून ज्ञानयोनीत जन्म घेतो. त्याकरीता त्याने परमेश्वर मार्गास अनुसरणे – उपदेश' घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे तो कर्मरहाटीतून दैवरहाटीत प्रवेश करतो. त्याने सर्व आयुष्य परमेश्वरास अपर्ण करावे. श्री. चक्रधरस्वामींच्या वचना प्रमाणे वागवे. त्यास

परमेश्वर मार्गाची आर्त हवी, जन्मोजन्मीच्या पापाची खंती यायला हवी. आपल्या कुकर्माबद्दल व परमेश्वर मिळत का नाही याबद्दल वारंवार पश्चाताप यायला हवा. विकास, विकल्प व हिंसा टाळायला हवी. दोषांचे प्रायश्चित्त घ्यायला हवे. परमेश्वरास शरण जावे, पुढील सात पदार्थ मिळविण्याकरिता साधकाने प्रयत्न करावेत. 1) स्थान, 2) प्रसाद, 3) वासनिक, 4) भिक्षुक, 5) शास्त्र, 6) ईश्वर, 7) प्रेम.

स्थानाची म्हणजेच परमेश्वर तीर्थक्षेत्रांची प्राप्ती करुन घेण्याकरिता साधक लागला तर त्यास पुढील सर्वच पदार्थ मिळतात.

'प्रसादसेवा अति गहनाचे गहन साधन होय.' विशेषतः 'श्रीगोविंदप्रभु' व ' श्री चक्रधर ' यांच्या संबंधित व त्यांच्या पवित्र झालेल्या सर्व वस्तू म्हणजे प्रसाद होत. म्हणून त्यांना वंदन, पूजन करावे. त्यांचे दर्शन घ्यावे. ध्यान करावे असा दंडक होय.

प्रसादसेवेच्या अनुषंगात "भटोबासाते गोसावी : भणितले : एथचेया संबंधा गेले : तेतुले वोटे गोटे आदि करुनि – तुम्हा नमस्कारणिये गा : " ही उक्ती महत्वाची आहे[1] श्री गोविंदप्रभूंनी खडकुली येथे इंद्रभटास एक वस्त्र दिले होते व त्याची पूजा वंदन इ. करावयास कथन केले होते. त्याला फूल वाहा असा आदेश दिला होता.

प्रसंगाचे वर्णन चक्षूंसमोर उभे करणे, स्थानांचे तपशीलवार वर्णन, छोटी सोपी वाक्यरचना, ओघवती शैली, वर्णनांचा बारकावा 'प्रसादसेवेत' अगत्याने दिसून येतो.

प्रसादसेवेत अंतर्भूत होण्या–या वस्तूंचे प्रमुख नऊ प्रकार बाइदेवांनी दिले आहेत. त्या नऊ प्रकारातील अनेक वस्तूंचा उल्लेख सहजगत्या पण मार्मिकपणे बाइदेव करतात.

उदा. 1) दाता आतु सेद कापुराची : फणी : हे मुख्य करुनि जेतुलेया दातांसि संबंधु जाला : तेंतुलेयांसि माझे दंडवत ॥*॥ 2) पाषणा आंतु मोतीयांचा टीळा : छीनस्थळी : माहाद्वारीचा उंबरवटु : आरोगण स्थानीचा खांबू : ओटा : गुढा : खडकुलीएचे खडक : हे मुख्य करुनि जेतुलेया पाषाणांसि संबंधु जाला : तेतुलया माझे दंडवत ॥*॥[2]

प्रसादाचे तपशीलवार वर्णन लेखकाने या रचनेत केले आहे. या वर्गीकरण व वस्तुनिर्देशनावरुन

बाइदेवांचा पंथीय अनुभव, अधिकार आणि पंथीय तत्वज्ञानावरील प्रभुत्व लक्षात आल्याखेरीज रहात नाही.

सगुण भक्तीतूनच निर्गुण भक्तीकडे निर्गुण परमात्म्याकडे जात असल्याने सर्व पंथियांनी प्रथम सगुण भक्तीला प्राधान्य दिलेले दिसते. सगुणत्वाकडून निर्गुणत्वाकडे असाच शेवटी प्रवास होत असतो.

महानुभाव पंथातदेखिल सगुण परमेश्वराच्या उपासनेलाच महत्व असल्यामुळे या परमेश्वरावताराशी संबद्ध अशा सर्व चराचर वस्तू पवित्र करुन ठरुन त्या पूजनीय मानल्या गेल्या आहेत. 'प्रसादसेवे' त स्वामी श्री चक्रधरांच्या संबंधी जंगम वस्तूंचा विचार केलेला आहे. परमेश्वरावताराचा संबंध वंद्य व प्रार्थनीय का? तर श्री चक्रधरस्वामीनीच तसा विधी सांगितला आहे. म्हणून परमेश्वरावताराचा ज्या प्रापंचिक पदार्थांशी संबंध येतो तेथे ते आपल्या प्रसन्नतेचा आणि कृपाशक्तीचा निक्षेप करीत असतात. म्हणजे अर्थातच् परमेश्वरावतार औदासिन्यस्वीकारुन जेथे गेले असतील तेथे त्यांच्या प्रसन्नतेचा आणि कृपाशक्तीचा संबंध निक्षेपिला असणे शक्य नाही. असे संबंध वंद्य आणि प्रार्थनीय नाहीत. ज्या प्रापंचिक पदार्थांना परमेश्वरावताराने प्रसन्नापूर्वक संयोगसंबंध दिला असेल तेच पदार्थ या दृष्टीने संबंध होत. त्यांना वंदन करणे म्हणजेच त्या तिथे निक्षेपिलेल्या कृपाशक्तीची प्रार्थना करणे होय. हे यातील खरे मर्म होय.

आचरत्या पुरुषाने निरावलंबी बनावे. आसक्ती सोडावी. स्वभावाला मूठमाती द्यावी. परमेश्वराचीच आशा मनात बाळगावी. महानुभाव धर्माव्यतिरिक्त कुणाही धर्मावर अवलंबून राहू नये. परमेश्वर दास्य करावे. परमेश्वरदास्य ज्ञानी, अज्ञानी आणि वेधवंत यांना परमानंद मिळवून देणारे आहे. चालू काळी सर्वसामान्य पुरुषासाठी श्री चक्रधर स्वामींनी परमेश्वराचे वचनरुप दास्य करावयास सांगितले आहे. स्थान, प्रसाद, भिक्षुक व वासनिक हेच वचनरुप परमेश्वर होत. यांच्या सेवेनेच परमेश्वर प्रत्यक्ष दर्शन देतो. ब्रम्हस्वरुप प्राप्ती करुन देतो. याकरीता परमेश्वर स्मरण करणे अत्यावश्यक आहे.[3]

केवळ संबंधी स्थानेच नव्हेत तर, संबंधी असलेल्या इतर जंगम वस्तूदेखिल महानुभावियांनी वंदनीय, पूजनीय मानलेल्या आहेत. याप्रकारच्या संबंधी वस्तूंना स्थूलमानाने "प्रसाद" असे संबोधण्यात आले आहे. अर्थात् हाही परमेश्वरावताराचा प्रसन्नतापूर्वक संयोग संबंध आलेला असतो. या प्रसादाचे नऊ प्रकार असून अशा प्रसादाची यादी अशी – 1. कापूस, 2. कोसला, 3. रोम, 4. दात, 5. काष्ट, 6. लोह, 7. पाखाण, 8. कातडे (चर्म) 9. धातू इ.

या सगळयांनी तयार झालेल्या म्हणजेच चक्रधर व गोविंदप्रभू यांचा संबंध आलेल्या वस्तू म्हणजेच प्रसाद होय. त्यांचे स्मरण व शक्यतो त्यांचे दर्शन पंथीय पूजनीय मानतात.

मूर्तिस्मरणाचे दोन प्रकार आहेत –

1. <u>दृष्ट स्मरण</u> – परमेश्वरावतार श्री चक्रधर स्वामींची मूर्ति जशी होती तशीच ती डोळयांसमोर आणणे यास ध्यानही म्हणतात.

2. <u>श्रुत स्मरण</u> – परमेश्वर मूर्तीचे जसे वर्णन लिहून ठेवले आहे, तसे ते आठविणे किंवा सांगितलेले ऐकुन मनन व चिंतन करणे.

परमेश्वर स्मरण चार प्रकारांनी करावे. 1) नाम 2) लीळा 3) मूर्ति 4) चेष्टा. यास महानुभावीय "चतुर्विध स्मरण" म्हणतात. यात "नामस्मरण" श्रेष्ठ आहे.[4]

स्मरण, दर्शन रोज घडावे अशी महानुभावियांची श्रद्धा आहे. नित्य प्रार्थनेस सर्व प्रकारांच्या प्रसादाचे स्मरण करणे आवश्यक असते. प्रसाद हे प्रत्यक्ष वंदन करण्यास मिळाले तर दुधात साखर. आणि हे अशक्यही नाही. श्रीगुंडमराऊळ उर्फ गोविंदप्रभू व श्रीचक्रधर यांचे अनेक प्रसाद महानुभावियांनी आज सातशे आठशे वर्ष साक्षेपाने व आस्थेने संभाळून जतन करुन ठेवले आहेतच. या अशा श्रद्धापूर्णतेने नटलेल्या प्रसादाचा महिमा प्रसादसेवेमध्ये गाइलेला आहे.

प्रसादसेवेत परमेश्वर नामाचे स्मरण करावे असे सांगितले आहे तर ते कोणत्या ? तर ज्या नामाचा परमेश्वराने स्वतः स्वीकार केलेला आहे. अभिमान घेतलेला आहे ते नाम 'श्रीचक्रधर' होय. म्हणूनच 'प्रसादसेवे' त बाइदेव म्हणतात,

"श्रीचक्रधरा : आता ए सृष्टीमध्ये : तु : :एकु वांचौनि : आणि : काइसेनही : पवित्र नव्हे गा : जी चक्रधरा : आपुलेनि दर्शने स्पर्शने : संभासणे आवलोकने : अंतष्करणे : माते अपवीत्राते पवित्र कीजो गा श्रीचक्रधरा ।। तुझे नाम : लीळा : मूर्ति : चेष्टा : अवस्थान : प्रसादु : वासनीकु : भिक्षु : यांचे सेवादास्य घडउनि : माते अपवित्राते पवीत्र की जो गा श्रीचक्रधरा ।।"

कलियुगामध्ये उभयदृष्यावतार श्रीचक्रधारस्वामीच श्रेष्ठ होत. ते कैवल्यदाते असून जीवाचा उद्धारकर्ते आहेत".[5]

चक्रधर म्हणतात , " प्रसाद सेवेने मनुष्य धर्मपालन करण्यास तत्पर होतो.

'प्रसादसेवे तव पुरुषू धर्मी दक्ष होई.'

परमेश्वराची ओढ, पापविनाशन विघ्नहरण पुण्यबुद्धी, दैवानुकूलता, सात्विकताप्राप्ती, प्रभूसान्निध्याची आच व आस, षड्रिपूंचा निपा:त वगैरे लाभ प्रसादसेवेने होतात. म्हणूनच महानुभाव पंथात नित्यपाठाप्रमाणे प्रसादसेवा आहे. नित्यपाठात प्रसादसेवा रचना ही रोज वाचावयाची असते.

प्रसादसेवारचना वाचणे व प्रसादसेवा वंदन करणे या दोन्ही क्रिया अपवित्र जीवास पवित्र करतात. अज्ञान, अन्यथाज्ञान, स्वउक्ती, लोकोक्ती, शास्त्रोक्ती, षड्रिपूंचे विकार इ. नी इहलौकिक व पारलौकिक दृष्टया जो अपवित्र असतो तो परमेश्वराच्या नाम, लीला, चेष्टा, मूर्ती व प्रसाद यांनी पवित्र होतो.

तसेच प्रसादसेवेत "आपुला नित्यवीधी निमित्यविधी घडउनि अपवित्राते पवित्र कीजो गा श्रीचक्रधरा।। असे बाइदेव म्हणतात.

परमेश्वराच्या दर्शनाने, स्पर्श व संभाषणाने, कृपादृष्टीने अंतःकरणाने अपवित्र जीव पवित्र होतो. उत्कट भक्तीचा उत्कृष्ट नमुना अनन्यभक्त बाइदेवबासांनी 'प्रसादसेवा' रचनेत व्यक्त केला आहे. प्रस्तुत रचनेत बाइदेवोबांनी चक्रधरांच्या संबंधित अनेक वस्तू नावा – गावानिशी व व्यक्तींच्या संदर्भात उल्लेखून महानुभावीयांवर एकप्रकारचा कृपाप्रसादच केला आहे असे म्हणण्यास हरकत नाही. त्यात त्यांच्या स्मृतींचा व नेमकेपणाचा आवाका ध्यानात येतो.

ज्या वस्तूंना महानुभावीय प्रसाद मानतात त्या सर्व वस्तूंना प्रभूचा स्पर्श झालेला अतः त्या वंदनीय त्यामुळे बाइदेवांनी त्या प्रत्येक वस्तूस वंदन केलेले आहे.

प्रसादवस्तूंचा तपशील, प्रसादाचे ठिकाण, प्रसाद प्राप्तीचा प्रसंग व त्या अनुषंगाने एखादी लीळा, प्रसादप्राप्तीचे कारण इ. गोष्टींची उत्तम सांगड बाइदेव या रचनेत घालतात.

महादाइसाने भटोबासाचा केसतोडा प्रसादाच्या वस्त्राने बांधला. ते रागावले तेंव्हा ती म्हणाली, "प्रसादे प्रसाद बांधावा" अशी परमश्रद्धा पंथीयांत आढळते.[6] प्रसादसेवेची महनीयता प्रत्यक्ष श्रीचक्रधर स्वामीनींही कथन केली आहे. ती सांगताना बाइदेव प्रसादसेवेत लिहितात –.

"गोसावी : डोंबेग्रामी औदास्याची प्रवृत्ति अंगिकरीली : तेव्हली गोसावीयाचीये दृष्टीसमोरु : कव्हणाही रीगवेना : तेव्हळी : भटोबासी श्रीप्रभूगोसावीयांची : प्रसादाची दुटी : दाखउनि वीनवीले : जी : जी :

श्रीप्रभुगोसावीयांची प्रसाददुटी जी : स्वीकारीजो जी : आणि गोसावीया प्रावर्ण केली : आणि : सर्वज्ञे भणीतले : ऐसे होए गा :"

जेंव्हा चक्रधरांना औदासिन्य आले त्यावेळी चक्रधरांच्यासमोर गोविंदप्रभुंची प्रसादाची शालजोडी धरण्यात आली. त्यांना ती स्विकारण्याची विनंती करण्यांत आली व त्यांनी ती पांघरली व औदासिन्य संपले.

प्रसादाचा बारिक – सारिक तपशील, प्रसादाची विविधता पुढील उदाहरणावरुन दिसेल.

"आता रोमे आतु : पांचवर्णी जाडी : सोरठ जाडि : चवरी : धोंगडे : सकलादोचे टोपरे : हे मुख्य करुनि जेतुलेयासि रोमांसि संबंध जाला : तेतुलेयासि माझे दंडवत ।।[7]

बाइदेवोबांनी प्रसादसेवेच्या शेवटी आपला अपवित्रपणा जावा अर्थात् श्री सर्वज्ञांनी आपणांकडून प्रसादसेवा घडवून घ्यावी अशी निर्वाणीची विनंती केली आहे. चार प्रकारचे ज्ञानी, आठ प्रकारचे भक्त, उपकारी गुरुकुळ या सर्वांना दंडवत करीत बाइदेव आपली प्रसादसेवा संपवितात.

।। शाब्दज्ञानी : अपरोक्षज्ञानी : सामान्यज्ञानी : वीशेखज्ञानियासि माझे दंडवत ।।

आठाइ भक्तांसि : माझे दंडवत : पुरभजनीया : विषप्रेमीया : आग्रहीया : तळमळीया : आत्महननीया : अवस्थाप्रगतटीया : उपाइया : आइकेत खेओ : जाए : या आठही भक्तांसि माझे दंडवत : उपकारनीमित्यासि माझे दंडवत : अशेखा गुरुकुळासि माझे दंडवत : एवं प्रसादसेवा समाप्त ।।*।।"

ज्या ज्या पंथीय मठात "प्रसाद" आहेत. तेथे तेथे आजही रोज सायं आरतीनंतर "प्रसादसेवा" केली जाते.[8]

बाइदेव पंथाचे द्वितीय आचार्य व चक्रधरांचे अनन्यभक्त असल्याने "प्रसादसेवा" ही रचना आकाराने लहान पण अर्थाच्या दृष्टीने महान पद्धतीची करु शकले. ही सर्व रचना गद्य स्वरुपातच असलेली दिसून येते.

परमेश्वर पूजेचे साधन श्री चक्रधरस्वामींनी आपल्या भक्त मंडळीना दिलेला वस्त्रप्रसाद होय. त्यांचे जतन महानुभावांनी अत्यंत काळजीपूर्वक करुन ठेविले आहे. त्या वस्त्रांच्या तुकडयांची "प्रसाद" बांधणी विशिष्ट प्रकाराने केलेली असते. प्रसादबांधणी झाल्यावर महानुभाव महंत अभिषेक करतात. प्रसादांची तत्प्रसंगी पूजाअर्चा करुन अन्नदान करतात.

परमेश्वरासंबंधी स्थान, प्रसाद असो की मग भिक्षुक असो त्यांच्या भेटीस जाताना दोन पाने, त्यावर एक सगळी सुपारी व नारळ अर्पून मगच त्यांना भेटावे असा विधी आहे. तो पंथीय लोक मोठया श्रद्धेने पाळतात.

**पूजावसर :**

'पूजावसर' ही एक बाइदेवबासांची एक अत्यंत लोकप्रिय अशी आणि रसाळ रचना आहे. चक्रधरांची दैनंदिनी, नामाचे श्रेष्ठत्व, नामाचे लाभ साधार व दृष्टांतासह सांगणे, मूर्तीचे ज्ञान, पाचापुराच्या मूर्तीचे ध्यान, नामस्मरण, वंदन या विशेषांनी बाइदेवांचे लिखाण समृद्ध व संपन्न आहे.[9]

श्रीचक्रधरस्वामींच्या तिन्हीं त्रिकाल होणा–या पूजाप्रसंगाच्या सोहळयाचे मोठया थाटाचे बहारदार वर्णन केले आहे. याला त्रिकाल पूजावसरे असेही नामाभिधान आहे. सकाळ, माध्यान्ह व सायंकाळ या तिन्ही प्रहरींचा वेगवेगळा पूजावसर बाइदेवांनी अतिशय सुंदर रितीने मांडला आहे. हा पूजावसर महानुभाव पंथीयांच्या नित्यस्मरणात अतिशय महत्वाचा मानला जातो. एकप्रकारे श्रीचक्रधरांची ही मानसपूजाच म्हणावी लागेल.

'परिश्रयापासोन तो सयनापर्यंत ' सा–या घटनांचे भक्तिभावाने केलेले वर्णन 'पूजावसरा' त दिसते. प्रस्तुत रचनेत स्वामींच्या दैनंदिनीचा बारिक – सारिक तपशील अगदी वास्तव स्वरुपात मांडला असून क्वचित् त्यास अस्तित्ववादाचा गंध येण्याइतका वाटतो. तसेच बाइदेव अगदी श्रीचक्रधरांचे खाजगी चिटणीस शोभावेत इतक्या सूक्ष्मतेने पूजावसराचे वर्णन जमले आहे. चक्रधरांच्या क्षणाक्षणाचा हिशेब देणारी, हालचालीचा अचूक वेध घेणारी तसेच तत्कालीन सामाजिक व भाषिक वैशिष्टयांचा संभार घेऊन येणारी अशी ही लेखनरचना आहे. बाइदेवांच्या लेखन पटुत्वाची, गुरुवरील अनन्यभक्तीची व एकनिष्ठतेची इथे साक्ष पटते.

'पूजावसर' या गद्य प्रकरणात बाइदेवांनी 'चक्रधरांची शब्दमूर्ती' रेखाटली आहे. त्यामुळे महानुभावांच्या नित्यपाठात त्याला स्थान मिळालेले आहे. तसेच त्यातील बाइदेवाबासांच्या भाषेची धाटणी आणि तत्कालीन जीवनाचे उमटलेले चित्र यामुळे प्राचीन महाराष्ट्र संस्कृतींचा अभ्यास करणारांना हे प्रकरण महत्वाचे साधन होऊन बसले आहे. यावरुन बाइदेवबासाची गुरुभक्ती, पंथावरील गाढ श्रद्धा, सूक्ष्म अवलोकनशक्ती, प्रसंग व व्यक्तिचित्र रेखाटण्याचे कौशल्य व सरळ निवेदनशैली आपल्याला जाणवते.

'पूजावसर' ही रचना आकाराने लहान असली तरी तिचे वाङ्‌मयीन सौंदर्य मात्र महान आहे. प्रातः माध्यान्ही व सायंकाळी त्रिकाल होणाऱ्या पूजावसराच्या वर्णनाचा आरंभ मोठा आकर्षक आहे.

जागृती, अवस्थान, वसति, आसन, शौच, मुखमार्जन, स्नानविधी, क्षौरकर्म, – वस्त्र – प्रावरण, धर्मवार्ता, निरुपण, पूजावसर वर्णन, आरोगणा, वामकुक्षी, वेठेसतपदी, विहरण प्रवृत्ती, धर्मशिक्षापण, श्रमदान – परोपकार – क्रीडापण व्याली, पद्मासन व सयनासन आदींचा समावेश यात होतो. हा श्रीचक्रधरांच्या मूल्यवान जीवनाच्या क्षणा क्षणाचा ही बिनचूक जमाखर्च आहे असेही म्हणता येईल. बाइसा व भटोबास यांचाही जीवनविशेष पूजावसराने समजतो.[10]

उदा. गोसावी : श्रीचरणाचेनि आंगुठेनि वक्षेस्थळ दाहीति : भट जागे होती : श्रीचरण हृदइ धरिती : आळंगिती : ललहाटावरि ठेविती : नमस्कारिती : मोमे देति : दुसरा श्रीचरणु मागमि : हृदई धरिति : आळंगिती : ललहाटावरि ठेविती : नमस्कारिती : मोमे देति :

'बाइसे ओटा झाडीति : ओटयावरी पद्मासन असे : ते शयनासन रचीति गोसावी पहुडू स्वीकरिती : बाइसे भीक्षान्य काढीति : काला करीति : मूढा करीति : वरि प्रसादु ठेविती : भक्तजना पांती प्रसादु भोजन होए : मग उचमंढासि जाती : बाइसे चरणसव्हान करीति :'

बाइसाचे चक्रधरसंगोपन, आरोगणाची आइत, मठाची झाडलोट, सडासंमार्जन, रंगरांगोळी व तिची चक्रधरसेवा यांचा प्रत्यय 'प्रसादसेवेत' घडतो. नागदेवाचार्य अर्थात भटोबास म्हणजे श्रीचक्रधरांचा चिटणीसच होय. त्यांचीही दैनंदिन कामे, स्वभावविशेष व त्यांचे पंथीय शिक्षण या सर्वांचा समावेश प्रस्तुत रचनेत आला आहे. पूजावसरात चरित्रकथन आहे. पाल्हाळ मात्र नाही. दिनचर्याकथनामध्ये रुक्षताचा लवलेशही नाही. बोलके प्रसंग परिणामकारी आणि बाइदेवांच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीचा प्रत्यय आणून देणारे आहेत. सरसकट निवेदनात्मकता, सरसता, नेत्रगोचरता हे लेखकाचे लेखनविशेष आहेत.

उदा. "भटोबास झोळी काठीयेसि घालूनी ठेवीति : गोसावीचेया श्रीचरणा लागति : नीधिवासेया हाता जाति : पूजाद्रव्ये हाठवठीया आणीति : बाइसे : हाती देति : आपण अलंकारु गुंफत बैसले असतिः"

"गोसावीयाचे भालप्रदेसीं स्वेदाचे बींदुबींदु ऐसे एति : ते मोतीयांचे कण ऐसे मीरवति : गोसावी : तांबाळ परित्यजोति : गुळला करीति : बाइसे : फोडी ओळगवीति वीडीया करुनि देती : तांबुळे असे ते भक्त जना प्रसादु वाटीति : "

"भट जागे होति : श्रीचरण त्हृदइ धरीति आळंगिती : ललहाटावरि ठेविती : नमस्कारीति : मोमे देति : दुसरा श्रीचरणु मागति :"

वरील सर्व उदाहरणावरुन असे दिसते की, सहजसंवादमयी अशी "पूजावसरा" तील भाषेची गुंफण आहे. जिवंत प्रसंग डोळयासमोर साकार करणारे परमार्थाने गंधित झालेले प्रसंगदेखिल चितारले आहेत. उदा. "बाइसे प्रस्तु करीति" जी जी आम्ही गोसावीयाते चिंतू गोसावी काइ चिंतिती, गोसावी म्हणति" बाई हे सकल जीवाते चींती, " कदाचित बाईसे प्रस्तु करीति" बाबा आम्ही बाबाते चींतु बाबा काइ चींतीति" बाइ हे श्री प्रभुची थापुचींती."

याशिवाय तेराव्या शतकातील वाड्.मयीन वास्तवता खरे पांहता विसाव्या शतकातल्या वाड्.मयीन वास्तवतेला लाजवणारी ठरेल. मात्र वास्तवतेकरीता वास्तवता इथे नसून सहज ओघात आली. ते खालील उदाहरणावरुन दिसेल.

"मग सोडीति आधीजि दीसी भटोबासी टोले दोनि आणुनि ठेवीले असति : ते सरीसे घेती : जगतीचा दारवंठा दक्षिणाभिमुख त्या पसिमीलीकडे परिश्रयस्थान गोसावी उत्तरदक्षिण परिश्रया बैसेति : तसेच आठदीसां क्षौर व चौदीसा मादने"

पूजावसराचे वर्णन म्हणजे शब्दांनी रेखाटलेले एक सुंदर चित्रच होय. समर्पक शब्दयोजना, छोटी व धावती वाक्ये, बोलीभाषेचा वापर, तत्कालिन शब्दवैशिष्टये दर्शविणारे शब्द या सर्वांचे एक मधुर रसायनच तयार झालेले आहे. एक बोलका लघुचित्रपटच वाटतो.

"भटोबास झोळी काठीयेसि घालुनि ठेवीति : गोसावीचेया श्रीचरणा लागति : नीधिवासेया हाटा जाती : पूजाद्रव्ये हाठवठीया आणीति : बाइसे : हाती देति : आपण अलंकारु गुंफत बैसले असति : गोसावी भोजन तेयां बीजे करीति : ही किती चित्रपूर्ण रचना आहे.

सकाळ, दुपार व संध्याकाळी पुढीलप्रमाणेच पूजा होई. "हातपाय धुति तोंड धुति सुकेले वस्त्र वेढीति : भटोबास गोपीचंदन उगाळीति. बाइसे गोसावीयाचा भालप्रदेसी गोपीचंदनाचा उर्ध्वपौड्रटीला रेखिती. दोन्ही रेखा सरसायाचि येति तो गलदंडा श्रीकंठा ओलंगवीति, श्रीमुगुटी मुगुटमाल मोकळया पुष्पांची पुजा करीति. श्रवणी झुलंबुके. बाहुभूषणे कलीयांचे हातसर श्रीकरी फुलांचा झेला ओलघवीति. धुपटणा आंगारा आणीति. आती पालमांडा ठेवीति. गोसावीयासि धुपार्ति होअे. मंगलार्ती होअे. "जयतु मंगला मंगला परम मंगलरुपा" हे जति ओलगविती.

भटोबास पाच दंडवत घालति. बाइसाच्या ठायी तर अष्टसात्विक भाव उमटत असत. भक्तिरसाचा उत्कट अविष्कार अन्यत्र शोधावयास नको. इथे जणू भक्तीला व्यक्तिमत्वच प्राप्त झाले आहे.

पूजावसराची भाषा अलंकारांनी नटलेली नाही. पण दरीद्रीही नाही. उपमा – अनन्वय व दृष्टान्त यासाखी सौभाग्यलेणी या भाषेने परिधान केलेली आहेत. गोसावीयांचे भालप्रदेषी बींदु बींदु येति ते मोतियांचे कण अैसे मिरवीति, या उपमेने भटोबासांना तथा नागदेवांना सुख थोर होअे तथा सूखा परिमाण कव्हणीचि नेणे' या अनन्वयाने किंवा खालील दृष्टांताने वरील वर्णनाची सत्यता पटल्यावाचून राहात नाही.

"मरा मरा पोरे हो तूम्हापासि वर ढोरे चांग. जेचि खाती तोचि रोवतौति तसेच अन्यवार्तेपरि निद्रा चांग, अन्यवार्ता अरुण्यरुदन" ही सुभाषित वजा वाक्यांच्या मौक्तिकमाला ही पूजावसरात दिसतात.

महानुभावीय विषयावरील महत्वपूर्ण लेख लिहिणारे श्री वा. ना. देशपांडे हे फार मोठे संशोधक आहेत. यानींही 'स्मृतिस्थळ' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत "बायबलच्या तोलाचे कोणते मराठी गद्य असेल तर ते बाइदेवबासाचे पूजावसर होय" या एकाच वाक्यात पूजावसराचे माहात्म्य गायिले आहे.

पूजावसरातील घटनांचा व कार्यक्रमांचा तपशील पाहिल्यावर त्यांच्या निरीक्षणशक्तीची व अभिव्यक्तीची जाणीव होते.

बाइदेवांच्या साऱ्याच ग्रंथरचना प्रार्थनास्वरुप आहेत.

परमेश्वराच्या प्रार्थनेची प्रत्येक क्रिया अंतःकरणापासून व्हायला पाहिजे. तेथे उपासनेचे नुसते ढोंग उपयोगाचे नाही. प्रार्थनेचे हे मुख्य रहस्य होय. परमेश्वराच्या आनंदमयी स्वरुपाची प्राप्ती हे त्याचे ध्येय असून ज्ञानप्रेमाचे उपाय ही मुख्य साधने होत. ही साधने आचरित असतां चित्तशुद्धीसाठी आपली अंतर्बाह्य

अपवित्रता नाहीशी करुन पावित्र्याचा प्रसाद प्राप्त करुन घेण्यासाठी नामस्मरण, मूर्तिध्यान, प्रसादसेवा व पूजावसर यांच्या साहाय्याने प्रार्थना करणे बाइदेवांना अगत्याचे वाटते.

'पूजावसरा' तील थोडक्यात मथितार्थ पांहता "श्रीचक्रधरांना" पहाटे जाग आल्यापासून रात्री झोपेपर्यंतचा दैनंदिन कार्यक्रमाचा तपशीलच दिला आहे.

**मूर्तिज्ञान –**

बाइदेवबासांच्या सर्वच ग्रंथरचना प्रार्थना स्परुपाच्या आहेत. पंथीय प्रार्थनेतील प्रसादसेवा असो, संबंध वंदन असो, नामस्मरण किंवा मूर्तिस्मरण असो हे सर्व अंतःकरणपूर्वक श्रद्धेने करायला हवे हे ओघानेच आले प्रसादसेवेप्रमाणे परमेश्वरावताराच्या मूर्तीचे व त्याने केलेल्या विविध क्रीडा प्रकारांचे ध्यान करणे हादेखिल महानुभावीयांच्या प्रार्थनेचाच एक वैशिष्टयपूर्ण भाग समजला जातो. उपासनेचे केवळ ढोंग करुन उपयोगाचे नसते. प्रार्थनेचे हे मुख्य रहस्य असते. अगदी मनापासून परमेश्वरावताराचे ध्यान केल्याने मनःशांती मिळते. मनाला दिलासा मिळत असतो. चैतन्य अंगातून निर्माण होते. परमेश्वराच्या आनंदमयी स्वरुपाची प्राप्ती हे त्या प्रार्थनेचे ध्येय असून ज्ञानप्रेमाचे उपाय ही मुख्य साधने होत.

संसारापासून मुक्त व्हावयाचे असेल तर साकार सगुण परमेश्वराची मूर्ती, लीळा, चेष्टा यांचे ध्यान करणे अगत्याचे ठरते. हेच बाइदेव मूर्तिज्ञानात वर्णन करतात.

ऐसा व्यक्त : सर्वशक्तीयुक्त : ईश्वर :श्रीचक्रधर जाणिजे : याते मूर्तिज्ञान बोलीजे ऐसा परमेश्वरू तयार नाम : लीळा मूर्ति : चेष्टा देहपर्यंत आठवीजे : ध्याइजे : तै या संवंसरापासौनि मुंचीजे : कोरडे अनुष्टीजे तरि मोक्ष होए [11]

महानुभावियांनी श्री चक्रधरावताराला फार महत्व दिले आहे. परमेश्वर नामाचे स्मरण करावे पण कोणत्या ?त्यास तर अनेक नामे आहेत ज्या नामाचे परमेश्वराने स्वत : स्विकार केलेला आहे. अभिमान घेतलेला आहे, ते नाम श्रीचक्रधर होय[12]

श्रीचक्रधरांचे अनन्यभक्त बाइदेवास आपले लेखन अंतरीच्या तळमळीतून करताना दिसतात. मूर्तिज्ञानात हुबेहूब वर्णन करण्याची त्यांची हातोटी परिचित होते. ईश्वरावताराने सचेतन जीवमात्राशी केलेल्या क्रीडांना 'लीळा' असे म्हणतात व अचेतन वस्तूमात्राबरोबर केलेल्या क्रीडांना चेष्टा म्हणतात. प्रार्थनेतून – अनादि दोषांमुळे अभिलाषा, अहंता, ममता, कामक्रोधादिकामुळे जीवस्वरुपावर प्रत्यही चढणा-या अपवित्रतेपासून सुटका व्हावी यासाठी तळतळ व्यक्त झाली आहे.

जीवाकडून नित्य दिवशी प्रत्यक्ष – अप्रत्यक्ष, कळत – नकळत किती तरी पापकर्मे घडत असतात. त्या सर्वांनी आपण अपवित्र झालो या वास्तव तळमळीने स्वतःच्या अंतःकरण शुद्धीसाठी ईश्वरप्रार्थना करण्यावाचून मनःशांतीचे दुसरे साधनच नाही. परमेश्वरच काय तो शुद्धबुद्ध "पवित्राचा पवित्र" आहे म्हणून बाइदेव 'मूर्तिज्ञान' मध्ये प्रार्थनेच्या वेळी सर्वांगसुंदर मूर्तीचे, त्याच्या लीळांचे व चेष्टांचे ध्यान करुन गुणविशेष शब्दांत आराधना करतात. ती अशी – "आगाध श्रीचक्रधरुबाबा : अनिमित्र बंधु श्री चक्रधरबाबा: अनाथनाथ श्रीचक्रधरबाबा : कृपाळू श्रीचक्रधरुबाबा : रुक्ष गा जी : ईश्वरा : कारुण्या : अवतारा : ऐसा कै डोळां देखिजसी : आपुलेनि दर्शने : स्पर्शने : संभासणे : माते अपवित्रा पवीत्रा करावें."

आपण अंतर्बाह्यदृष्टया निष्पाप व पवित्र होऊन परमेश्वराच्या कृपाप्रसादास पात्र व्हावे हीच उदात्त आकांक्षा या प्रार्थनेच्या मूळाशी असलेली दिसते.

मूर्तिज्ञानाची सुरुवातच –

"अव्यक्ता श्रीमुर्तिधार्या ईश्वराचे ज्ञान ते कैसे : ना : ते ऐसे नव्हे : जे नीर्वेव नीराकारू असे : तो सावएव साकारू होऐ : श्रीमूर्तिधार्या होऐ : श्री :भणीजे : माया : तिए माएचा वेखु स्वीकरीती : कापा : जे सर्वज्ञे भणीतले : सृष्टीमध्ये परमेश्वरू अवतरति : "अशी केली आहे.

परमेश्वर मूर्तिधार्या होतो म्हणजे काय याचे तत्वज्ञान कथन केले आहे. परमेश्वर मायावेशधारी अवतार घेतो. मायापुरा तो प्रवेशतो. द्वापार युगातील श्रीकृष्णगर्भीचा अवतार, त्याच्याजवळ ज्ञान व विज्ञान शक्ती होती. तो उभयदृश्यावतार होता. पुढे त्रेतायुगातील मातापुराचा श्रीदत्त (एकमुखी ) याने सैह्याद्रीस

अवस्थान केले. व अनंत जीव उध्दरले. त्यानंतरचा मूळचा फलटणचा पण स्त्री आग्रहाने मातापुरास गेल्यानंतर व्याघ्र स्वरूपात त्यावर दत्तकृपा झाली. असा द्वारावतीचा चांगदेव राऊळ हा तिसरा अवतार या अवताराच्या क्रीडा बालक्रीडावत् होत्या. पाचवा अवतार द्वारावतीच्याच चांगदेव राउळांचा पण कामाख्या नावाच्या स्त्रीउपसर्गाने पुरा म्हणजे देहत्याग करून गुर्जर प्रधानपुत्र हरपालदेवाच्या मृतदेहात प्रवेश केलेला हा चांगदेव म्हणजे श्रीचक्रधरावतार होय. यांचे संपूर्णावतार म्हणून नखशिखान्त वर्णन बाइदेवास मूर्तिज्ञानात करतात.

कलियुगांमध्ये उभयदृश्यावतार श्रीचक्रधर स्वामीच श्रेष्ठ होत. ते कैवल्यदाते असून जीवाचा उद्धारकर्ते आहेत. अधिकारी जीवांना योग्यतेप्रमाणे ज्ञान व प्रेम देतात. कारण कलियुगी उत्तरापंथी त्यांचा अवतार आजही विद्यमान आहे.

प्रथमच्या 4 अवतारांचे श्रेष्ठत्व व लीला अगदी थोडक्यात बाइदेव मूर्तिज्ञानात वर्णितात. मात्र पूर्णावतार श्रीचक्रधर स्वामींचे मात्र नखशिखान्त वर्णन करतात. वाङ्मयीन गौरवर्ण असलेली तेजःपुंज मूर्ति, शुभचिन्हांकित पदकमल आकर्षक जंघायुगल सखोल नाभी, समतट उदर, मृदुतररोमराजी, आजानबाहु, सरळ तरतरित नाक, विशाल नेत्र, सुंदर धनुष्याकृती भुवया, भवईवर मस गोबरे गाल व भव्य भाल, रम्य मुगुट, वय सुमारे 25 ते 27 असा राजबिंडा व सर्वांगसुंदर आणि माहावाक्यातील गुणधर्मांनी युक्त असे चक्रधरांचे वर्णन करुन शिवाय प्रभूने आपला स्पर्श घेऊन कोणकोणती वस्तू वंदनीय, स्मरणीय केली त्या लीळा, व्यक्तींच्या नावानिशी, गावानिशी बाइदेवांनी मूर्तिज्ञानात समाविष्ट केलेल्या आहेत. [illegible] [illegible] आहे. चक्रधरमूर्ति व अवतारचरित्र, लीळा, चेष्टा, संबंध, प्रसाद, नाम इ. सर्वांचा अर्कच मूर्तिज्ञानात एकवटलेला आहे. पाचापुरांच्या पाच अवताराच्या मूर्तीचे ज्ञान या रचनेने होते.

भक्तीचे एक अंग म्हणजे मूर्तिज्ञानाचे ध्यान होईल. थोडक्यात काय? तर, चक्रधरांच्या लीळा, चरित्राचा व त्यांच्या साकार नखशिखान्त वर्णनाचा सुरेख संक्षेप मूर्तिज्ञानात आहे. मूर्तिज्ञानात श्रीकृष्ण, श्रीदत्तात्रेयप्रभू (एकमुखी) श्रीचांगदेवराउळ, श्रीगोविंदप्रभू, व श्रीचक्रधर या पंचकृष्णांचे वर्णन कथिले आहे. परमेश्वरावताराच्या मूर्तीचे व त्यांनी केलेल्या विविध क्रीडांचे ध्यान करणे हा महानुभाव पंथाच्या प्रार्थनेचा एक भाग दिसतो. मूर्तिज्ञानात व्यक्तिवर्णन, स्थलवर्णन, पोषाख विशेष, अन्नविशेष यांचा एक क्रम लक्षात घेण्यासारखा आहे. संवादरचना, वाक्प्रचारांचा वापर केलेलाही दिसून येतो.

उदा. 'करांगुळी ऐसी भावीजे : ध्याइजे जें ।। ताकवताची भाकवताची भाजी वाढवणे ।।

निखळभक्तीच्या पोटीच बाइदेवांनी आपल्या ग्रंथरचना रचलेल्या असल्याने त्यात श्रद्धा ओतप्रोत भरली आहे. या 'मूर्तिज्ञान' रचनेला पाचापुराचे मूर्तिज्ञान असेही म्हणतात. चक्रधरांचे सावयव वर्णन, सर्व अंगप्रत्यंगाच्या अनुषंगाने एखाद्या लीळेचे व एखाद्या भक्ताचे स्मरण इ. गोष्टी लक्षात येतात. मूर्तिज्ञानाच्या सहाय्याने किंवा कारणाने श्रीचक्रधर स्वामींच्या प्रत्येक अवयवास, गुणास, कृतीस, मनोभावे दंडवत श्रीचक्रधरांच्याच अनन्य भक्ताने – बाइदेवबासाने घातले आहे.

स्त्रियांच्या संदर्भात श्रीचक्रधरांच्या अनुषंगाने काही दंतकथा व आख्यायिका आपण ऐकतो. त्याची आठवण पुन्हा पुन्हा येत राहाते ती इथे त्यांच्या सौंदर्याच्या देखणेपणाच्या वर्णनानें त्यांचे सुलक्षणी तारुण्य, त्यांच्यावर आलेल्या आरोप – प्रत्यारोपाचे कारण ठरणे साहजिक वाटते. यामुळे श्रीचक्रधरांचे मूर्तिज्ञानात केलेले नखशिखान्त वर्णन मनावर अधिकच ठसते.

बाइदेवबासाचे मूर्तिज्ञान नित्याच्या प्रार्थनेत समाविष्ट केलेले आहे. यावरुन पंथियांच्यात बाइदेव बासांच्या ग्रंथांचा किती मान होता हे स्पष्ट होते.

**नामाचे दहा ठाय / नामस्मरणाचे श्रेष्ठत्व** :

प्रामुख्याने सर्वच पंथीयांनी आपापल्या आराध्य मूर्तीच्या नामस्मरणाला महत्व देऊन नामस्मरणाचा मोक्षमार्ग म्हणून स्वीकार केलेला आहे. भागवत धर्मीयांनी तर त्याला विशेष स्थान दिले आहेच. महानुभावांच्या नित्याच्या प्रार्थनेत परमेश्वरावताराच्या नामस्मरणाला जे महत्व आहे ते आगळेच । महानुभाव पंथदेखिल भागवत संप्रदायच आहे. नामस्मरणाला महानुभावीयांनी प्रार्थना तत्वात श्रेष्ठ स्थान दिलेले आहे. त्यांनी परमेश्वराचे स्मरण चार प्रकारांनी करावे असे सांगितले आहे. 1. नाम, 2. लीळा, 3. मूर्ति, 4. चेष्टा

महानुभावीय यास 'चतुर्विध स्मरण' म्हणतात. यांत नामस्मरण श्रेष्ठ मानले जाते.

साधकाला नामस्मरणाने वेध होतो. बोध होतो. अनुसरण वाढून उत्तम प्रकारे स्मरण करता येते. संकटाचा नाश होतो. प्रत्यक्ष 'स्वामी' भेट देतात.

ज्या नामाचा परमेश्वराने स्वतः स्वीकार केलेला आहे. अभिमान घेतलेला आहे, ते नाम 'श्रीचक्रधर' असे महानुभाविय समजतात.

बाइदेवबासांनी 'नामाचे दहा ठाय' हे स्वतंत्र प्रकरणच तयार करुन आपली भक्ती प्रकट केली आहे. त्यात त्यांनी चक्रधरांनी जे नाममहात्म्य आपल्या शिष्यांना सांगितले ते पुराव्यानिशी मांडले आहे. एका दृष्टीने पाहतां प्रत्यक्ष परमेश्वरावताराच्या सावयव मूर्तिस्मरणापेक्षाही नामस्मरण अधिक श्रेष्ठ. कारण मूर्तिस्मरणात नामस्मरण येत नाही. मात्र नामस्मरणात मूर्तिस्मरण येते. अर्थात् नामस्मरणाने मूर्तिस्मरण आपोआपच होते. परमेश्वरावतार ब्रम्हविद्येचे निरुपण करतात. तेव्हा 'नाम' प्रथम सांगतात. बाइदेवांनी 'नामाचे दहा ठाय' मध्ये नाममाहात्म्याची अनेक उदाहरणे दिलेली आहेत. लीळाही सांगितल्या आहेत, व नामस्मरणाचे श्रेष्ठत्व प्रस्थापित केले आहे. बाइदेवांच्या पंथाच्या अनन्यनिष्ठेस व गुरुच्या, परमेश्वराच्या भक्तीस हे नामाचे दहा ठाय शोभायमान करणारे आहेत.

आपण नेहमी म्हणतो, "प्रभू तू मज भेटशील कवणे ठायी" याठिकाणी ठायीचा अर्थ ठिकाणी असा आहे. तोच अर्थ "नामाचे दहा ठाय" मध्ये आहे. परमेश्वराच्या नामस्मरणाच्या संदर्भात दहा ठिकाणी भक्तांना नामस्मरणाचे श्रेष्ठत्व दर्शविणारे दहा दृष्टान्तदेखिल कथन केले आहेत. नामाच्या दहा ठायात दहा

लीळांच्या आधारे आपल्या भक्तांना श्रीचांगदेवांनी नामाचा महिमा पटवून दिला आहे.

बाइदेव 'नामाचे दहा ठाय' मध्ये म्हणतात, "ईश्वर : ब्रम्हविद्या नीरुपती : तेव्हळी आधीं नाम सांधेती : ते नाम उचारीले दृपदाउसी : जे कौरवी अवकळा केली : ते कौरव तेणे नामोचि संहारिले : तेणे नामे दृवासेया सिख लाविली : जै पांडवाते सापू आला : तै तेणे नामे आपुलेया ऐस्वर्याचा टीळा सारिला : भणौनि साकारासि ढळो चळो न ए :" अशा प्रकारची अनेक उदाहरणे देऊन नामस्मरणाचे श्रेष्ठत्व बाइदेवांनी स्पष्ट केले आहे. आपले म्हणणे स्पष्ट करण्यासाठी निरनिराळे व्यवहारातील दृष्टान्त देऊन खुलासा करण्याची पद्धती या रचनेत लक्ष वेधून घेते.

'अमृताहूनही गोड नाम तुझे देवा' असे परमेश्वराच्या नामाचे गान आपण नेहमी ऐकतो. इथेही नामाचे स्मरण म्हणजे प्रार्थनेतील सुवर्णमणीच मानला जातो. नामस्मरणाचे विविध लाभ बाइदेव कथन करताना लिहितात –

"ऐसे नाम वेधवंत : नामे वेधु ।। नामे बोधु ।। नामे अनुशरण ।। नामे स्मरण ।। नाम सकळ नीरोध परीहरी ।। नामे वाजत वारा धरी ।। नामे पडते आकाश धरी ।। नाम एते वीहून हरी ।। नाम साह्याते करी ।। नाम प्राप्तीते करी ।। तरि नामे वेधु केवि : ना : "

लाभाबरोबरच बाइदेवांनी नामस्मरणाचे प्रकार नामस्मरणासंबंधी असणाऱ्या लीळा व त्यास समर्पक दृष्टान्त व त्याचे ठिकाण अशी एक शृंखलाच जडविली आहे. यामुळे रचनेत एकप्रकारचा ठोसपणाच निर्माण झाला आहे. नामस्मरण करणारा भक्त कोण ? तो नामस्मरणाने कसा तरला याचेही निवेदन मनाला भावणारे आहे. अगदी सोप्या भाषेत, पाल्हाळ न लावता सहजतेने, सुहृदयतेने बाइदेवांनी "नामाचे दहा ठाय" रचले आहे. एका विशिष्ट क्रमाची मालिकाच यात दिसून येते. नामस्मरणाचा लाभ – नामस्मरण करणारा भक्त – नामस्मरण लीळेचे ठिकाण – नामस्मरणास समर्पक दृष्टान्त व शेवटी परमेश्वरावताराचे –

"नाम आठवीजे : स्मरीजे : ध्याइजे : तैचि या सैंवसारापासौनि मूंचीजे : भणौनि : भटोबासी भणीतले : ऐणे अवतारे नुधरे : तो काहीवि नुधरे : "असे माहात्म्य गायिले आहे.

प्रथम नामे वेध संचारतो. हिरवली गावी लखोबासास नामाने वेध संचारला. हा 'सुक्षेत्र' बीजन्यायाच्या दृष्टान्ताने स्पष्ट केला आहे. जमीन – बी – पाणी इ. गोष्टींच्या रसायनाने उत्तम पीक येते. बी जर का खडकावर पडले तर ते फुकट जाते. हाच प्रकार नामाच्या बाबतीतही आहे. परमेश्वराचे नाम, योग्य भक्त यांचा मिलाफ आवश्यक असतो. नामस्मरण पूर्वपुण्याईने सुचते. या नामस्मरणाने डोंबेग्रामी म्हाइंभटास बोध झाला. परमेश्वराचे अचूक ज्ञान हा बोध झाला. अन्यथाज्ञान हत्तीच्या दृष्टान्ताने कथन केले आहे. जन्मतःच आंधळया असणा–या व्यक्तींना हत्तीचे वेगवेगळे म्हणजेच अन्यथा ज्ञान होते. सत्यज्ञान भक्तास क्वचित होते. परंतु नामस्मरणाने मात्र सत्यज्ञान होते. नामस्मरणाने अनुसरण होते डोंबेग्रामी देमाइसेला हे अनुसरण झाले.

"तरि नामे अनुसरण केवी : ना : डोमेग्रामी देमाइसा कुष्टधर्म नीरुपणे : ते लीळेचेनि न्याये : हेचि केवि ना : कुष्टियाचेनि दृष्टांते : तेचि केवि : ना : सर्वज्ञे भणीतले देओ माझा : मी देवाचा :

अनुसरण कुष्टरोग्याप्रमाणे व्हावे असा दृष्टान्त इथे दिला आहे. कुष्ठरोगी 'मी देवाचा देव माझा ' या एका भावनेने जगतो. तसे या प्रकारचे नामस्मरण करणा–या भक्ताचे होते.

नामस्मरणाने परमेश्वराचे स्मरण होते. चांगदेवास मांगरौली येथे असे स्मरण झाले. कीटक गांधील माशीचे स्मरण करतात करता स्वतःच गांधीलमाशी होतो. त्याप्रमाणेच भक्ताचे व परमेश्वराचे होते. परमेश्वराचे नामस्मरण करता करता भक्त तद्रुप होतो. उद्धरतो. नामाने निरोधपरिहार होतो. हे सांगताना निरोध परिहाराचे उदाहरण म्हणून अश्वाचा दृष्टान्त दिला आहे. विषयनिरोध केला तरी अश्व मरत नाही. तसेच मानवाचे आहे. इंद्रियदमन करण्याने माणूस मरत नाही. हे सुचविण्यासाठीच अश्वाचा दृष्टान्त इथे दिला आहे.

नामस्मरणाने निरोधपरिहार साधतो असे कथन केले आहे. "तारि : नाम वाजत वारा धरी : केवि : ना : रीणाइताचेनि दृष्टान्ते : तेचि केवि : ना : सर्वज्ञे भणीतले : ना भीया हो साधे हो : तुम्हावरि : वाजत वारा धरी ।। यातून नामस्मरणाने अभयप्राप्ती होते ते सांगितले. डोंबेग्रामी साधेस असे अभय मिळाले. त्यासाठी ऋणाइताचा दृष्टान्त देऊन राजा जसे ऋणकोला अभय देतो तसा परमेश्वर नामस्मरण करणा–या भक्तास

13169
A

अभय देतो हे सांगितले आहे. पुढे बाइदेव लिहितात की, "तारि : नाम पडतें आकास धरी केविं : ना : इंदीयाचेनि दृष्टान्ते : तेचि केवि : ना : सर्वज्ञे भणीतले : धर्माचीया चाडा रायाची राणी का न ए : वरिपडते आकाश धरीजैल : भणौनि : नाम वरि पडते आकास धरी ।।"

अशाप्रकारे नामस्मरणाने पडते आकाशदेखिल धरले जाते. संकटी नामस्मरणाने रक्षण होते. प्रल्हादाचे रक्षण नामानेच केले. नामस्मरणाने पेहरासंगम येथे रानाइसाचे रक्षण केल्याचे बाइदेव इथे सांगतात. नामस्मरण रक्षण करते हे पटवून देण्यासाठी दंद्वीचा दृष्टान्त घेतला आहे. शस्त्रोपजीवी योद्धा हतबल झाल्यावर तोही राजाश्रय घेतो तसेच हे आहे. बेलापुरास माहादासाइसेया जाडयप्रसंगी नामस्मरणाने ते जाडयहरण कसे झाले ते सांगितले आहे. नामाने विघ्नहरण होते. हेच इथे सूचवायचे आहे. लेकुरवाळी माता हट्टी बालकाचे हट्ट पुरविते. त्याप्रमाणे परमेश्वर आपल्या भक्ताचे रक्षण करतो. "नाम साह्यातें करि :" साधेला सोबत देऊन जोगेश्वरी येथे श्रीचक्रधराने साह्य केले. हे सांगताना त्यांनी दृष्टान्त असा दिला की,

**महत्व :**

आई ज्याप्रमाणे आपल्या मुलास तूपभाताचा घास मुलाने तोंड फिरविले तरी भरवते. तसेच परमेश्वर भक्तास साह्य करतो. याच्यापुढे बाइदेव द्वारकेस श्रीकृष्ण प्राप्ती अर्जुन व उद्धव या दोन्हीं भक्ताना नामस्मरणानेच झाली असे सांगताना सुरीचा दृष्टान्त देतात. नामस्मरणाने वाया गेलेला मनुष्यही श्रेष्ठ बनतो. टाकून दिलेली मोडीत टाकलेली सुरी धारवाला घेऊन परत त्या सुरीस ठीक करुन राजदरबारी विकतो व तिचे मूल्य प्राप्त करुन देतो. तद्वत परमेश्वर जीवांचा उद्धारकर्ता ठरतो. त्यासाठी नामस्मरण अत्यंत श्रेष्ठ साधन आहे.

नामस्मरणाचे श्रेष्ठत्व लीळा व दृष्टान्ताआधारे विशद करण्याचा हा प्रयत्न श्रीचक्रधरांच्या निष्ठेला उठून दिसणाराच आहे. परमेश्वर नामाच्या महिम्याचा प्रत्यय त्यांना आला. बाइदेव गोविंदप्रभूंचा परमभक्त होता. त्यांची निष्ठा पूजावसरात प्रकट झाली आहेच. तीच निष्ठा पुन्हा नामाच्या दहा ठायात पण दिसते.

रामनामाने वाल्याचा वाल्मिकी झाला हे सर्वश्रुत आहेच. नवविधा भक्तीतही नामस्मरणाचे महत्व आगळेच आहे. नुसते नामाचे महत्व सांगण्यापेक्षा सोदाहरण पुराव्यानिशी या नामाच्या दहा ठायात बाइदेवांनी प्रभूच्या नामाची गौरवागाथा गाइली आहे.

छोटी, धावती वाक्यरचना, प्रसंग चक्षूंसमोर उभा करणारी शब्दरचना, अचूकता, सर्वज्ञनिष्ठा, दृष्टान्त देण्याची साधी, समर्पक प्रासंगिक शैलीधाटणी , उद्बोधक, मनोरंजनाचा मिलाफ नामाचा दहा ठायात यांचा अतुलनीय मेळ घालून देऊन बाइदेवांनी आपले भक्तत्व श्रेष्ठ केले आहे. नामाचे दहा ठायांना इथे ते अमरत्वच प्राप्त करून देतात. हे वर्णन इतके सुंदर उतरले आहे की, पंथीयांना हे नामाचे दाहा ठाय, नित्यपाठात अंतभूत करावे लागते. यातच त्यांच्या लेखनाचे सामर्थ्य सामावले आहे. इथले पूजावसर, मूर्तिज्ञान, प्रसादसेवा यातील बाइदेवांचा निखळ भक्तीचाच आपणांस प्रत्यय आल्यावाचून राहत नाही.

वरील सर्व वाड्.मयीन गद्य स्वरूपावरून आपणांस · असे म्हणता येईल की, नित्यदिनीलीळा मधिल पूजावसर, प्रसादसेवा, मूर्तिज्ञान व नामाचे दहाठाय या रचनामधून बाइदेव आपले लेखन अंतरीच्या तळमळीतून करतात. डोळयांसमोर हूबेहूब प्रसंग उभा करण्याची क्षमता " लक्षात येते. मूर्तिज्ञानातून प्रत्यक्ष

वर्णन करण्याची हातोटी परिचित होऊन निर्जिव मठ आपल्या शब्दशिल्पातून साकार करतात. प्रसाद् वस्तूंना चैतन्य, सुंदरता प्राप्त करून देतात. नामाच्या दहा ठायाना अमरत्व देवून एक वेगळेच स्थान प्राप्त करून देतात. सूक्ष्म निरीक्षणशक्ती, स्थलवर्णने जिवंत करुन त्यांना शब्दांनी आकार देतात. वरील सर्व गद्यरचनेत कुठेही कृत्रिमता आलेली नाही. सहजसुंदर असेच हे लेखन आहे. पावित्र्याचा प्रसाद प्राप्त करुन घेण्यासाठी नामस्मरण, मूर्तिध्यान, प्रसादसेवा, पूजावसर, यांच्या सहाय्याने बाइदेवांनी एकप्रकारे प्रार्थनाच केली आहे.

**संदर्भ :**


1. प्रसादसेवा संहिता.
2. तत्रैव.
3. महानुभावदर्शन – लेखक डॉ. अण्णासाहेब अडसोड, महानुभाव विश्वभारती, अमरावती 1972 पृ. 161.
4. तत्रैव पृ. 162
5. तत्रैव पृ. 162
6. बाइदेवबासचरित्र व नित्यदिनीलीळा, संपा. के. सी. क–हाडकर, अहमदनगर, मे. 1977 पृ. 17
7. नित्यदिनीलीळा "प्रसादसेवा" संपा. ह. ना. नेने, अरुण प्रकाशन, नागपूर पृ. 2
8. महानुभाव दर्शन लेखक – डॉ. अणासाहेब अडसोड, महानुभाव विश्वभारती, अमरावती 1972 पृ. 173.
9. नित्यदिनीलीळा.
10. बाइदेवबासचरित्र व नित्यदिनीलीळा, संपा. के. सी. क–हाडकर, अहमदनगर, मे. 1977 पृ. 61
11. मूर्तिज्ञान संहिता.
12. महानुभावदर्शन लेखक अण्णासाहेब अडसोड, महानुभाव प्रकाशन नागपूर, 1972 पृ. 162.


–x–